# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३.०४.२०२६

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (०७.०४.२०२६ ते १३.०४.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१४.०४.२०२६ ते १८.०४.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ४० | ४१ | ४१ | ४० | ३९ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २१ | २२ | २२ | २३ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | ० | ० | २ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४० | ३७ | ३४ | ३५ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २६ | २४ | २३ | २२ | २४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ८ | ८ | ४ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | वा. | वा. | वा. | वा. | उ.वा. |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये १४ ते १८ एप्रिल दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. **सातारा जिल्ह्यामध्ये १८ एप्रिल पर्यंत कमाल तापमानामध्ये २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता असून कमाल तापमान ३९.० ते ४१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २१.० ते २३.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.** सकाळची सापेक्ष आद्रता ३२ ते ४०% या दरम्यान, दुपारची सापेक्ष आद्रता २२ ते २६% या दरम्यान राहण्याची तसेच वाऱ्याचा वेग ताशी ४ ते ८ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १२ ते १८ एप्रिल दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | **शेतकरी बांधवांनी उष्णतेपासून बचावासाठी खालीलप्रमाणे काळजी घ्यावी**<br>➢ दुपारच्या उष्णतेत (१२ ते ४) शेतातील काम टाळावे<br>➢ हलके व सैल, कापसाचे कपडे परिधान करावेत<br>➢ डोक्यावर टोपी / गमछा वापरावा<br>➢ भरपूर पाणी, ताक किंवा लिंबूपाणी पिणे आवश्यक<br>➢ थेट उन्हात जास्त वेळ काम करू नये, मध्ये मध्ये विश्रांती घ्यावी<br>➢ उष्णतेमुळे चक्कर, डोकेदुखी, अशक्तपणा वाटल्यास लगेच सावलीत विश्रांती घ्यावी<br>➢ काम करताना शरीरावर पाणी शिंपडावे किंवा थंड पाण्याने चेहरा धुवावा<br>➢ मद्यपान टाळावे (उष्णतेचा परिणाम वाढतो)<br>➢ उष्ण व दमट हवामानात स्वतःची काळजी घेतल्यास उष्णतेचा ताण टाळता येतो. |
| संदेश | | कमाल तापमान वाढण्याची शक्यता असल्यामुळे बाष्पीभवन दर वाढेल. त्यामुळे पिकांच्या पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी त्यांच्या आवश्यकतेनुसार पाणीद्यावे. |
| मका | वाढीची | ➢ उष्ण हवामानामुळे बाष्पोत्सर्जन वाढून पिकावर पाण्यचा ताण येऊ शकतो. त्यामुळे पिकाला पाण्याचा ताण येऊ देऊ नये<br>➢ जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी विशेषत: सकाळी किंवा संध्याकाळी हलके पाणी द्यावे |
| सुर्यफुल | पक्वता | ➢ पक्व झालेल्या सुर्यफुल पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेल्या शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| टोमॅटो | फुलोरा ते फळधारणा | ➢ टोमॅटो पिक उष्णतेस संवेदनशील आहे, उष्ण हवामानामुळे फुलगळ होते, परागीभवन कमी होऊन फळधारणा कमी होते, दिवसा पाने कोमेजतात यामुळे उत्पादनात घट होते तसेच फळांमध्ये तडे जाणे व सनस्कॉल्ड दिसून येते हे टाळण्यासाठी खलील उपाययोजना कराव्यात<br>➢ पिकास हलके पाणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी द्यावे<br>➢ शक्य असल्यास शेड नेट वापरावे<br>➢ पानांवरील डाग व कुज रोगांवर लक्ष ठेवून आवश्यक नियंत्रण उपाययोजना कराव्यात |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ उष्ण हवामानामुळे बाष्पोत्सर्जन वाढते, परिणामी पिकावर ताण येऊन वाढ व उत्पादनावर परिणाम होतो त्यामुळे जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी हलके व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे<br>➢ बाष्पीभवन कमी करण्यासाठी आच्छादन (मल्चिंग) करावे |
| आले | कंद वाढीची | ➢ आले लागवडीसाठी एप्रिल महिन्यात बेणे खरेदी करावे व रासायनिक व जैविक बिजप्रक्रिया करुन बेणे सावलीच्या ठिकाणी साठवावे. मातृकंदापासून बियाण्याचे तुकडे वेगळे.<br>➢ जैविक बिजप्रक्रियेसाठी अॅझोस्पिरिलियम २५ ग्रॅम तसेच पी.एस.बी. २५ ग्रॅम प्रति लिटर पाणी वापरावे.<br>➢ बियाणे निवडताना कंदाचे वजन २५ ते ५५ ग्रॅम, लांबी २.५ ते ५ सें.मी. सुप्तावस्था संपलेले २ ते ३ डोळे फुगलेले आसवे. हेक्टरी २५ क्विंटल बेणे लागते. |

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com


| | | |
|---|---|---|
| | | ➢ लागवडीच्या वेळेपर्यंत या बियाण्याच्या वजनात घट होवून साठवणुकीच्या पध्दतीनुसार त्याचे वजन १५ ते १८ क्विंटल भरते. |
| आंबा | फळ वाढीची | वाढलेल्या उष्णतेपासून संरक्षण होण्यासाठी पुढील उपाय करावेत<br>**सिंचन व्यवस्थापन:**<br>➢ हलके व वारंवार सिंचन करावे, पाण्याचा ताण येऊ देऊ नये, जमिनीत ओलावा व्यवस्थित समान राखावा<br>**आच्छादन**<br>➢ पेंढा/सुक्या पानांचे आच्छादन करावे, बाष्पीभवन कमी होऊन मुळांभोवती थंडावा राहतो<br>**हवा खेळती ठेवणे:**<br>➢ झाडामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी फांद्यांची दाटी/गर्दी टाळावी<br>**उष्णतेपासून संरक्षण:**<br>➢ शक्य असल्यास शेडनेट वापरावे<br>**महत्वाची सूचना**<br>➢ दुपारच्या उन्हात (१२ ते ४ वाजेदरम्यान) फवारणी टाळावी, बागेची नियमित पाहणी करून रोगांची सुरुवातीची लक्षणे ओळखावीत |
| नारळ | वाढीची | ➢ उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ रोपांना शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी. |
| पशुधन | वाढीची | जनावरांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पुढील उपाय करावेत...<br>➢ म्हशींना घर्मग्रंथी खूप कमी असल्याने व त्यांची त्वचा काळी असल्याने वाढणाऱ्या तापमानाचा गायींपेक्षा म्हशींना त्रास जास्त होतो म्हणून म्हशींना पाण्यात डुंबन्यास सोडावे.<br>➢ जनावरे सावलीच्या ठिकाणी बांधावीत. शक्य असल्यास दिवसातून ४ ते ५ वेळा त्याच्या अंगावर पाणी फवारावे.<br>➢ शक्य असल्यास गोठ्यांमध्ये फॅन लावावेत<br>➢ जनावरांना पुरेशे, शुद्ध व थंड पाणी पिण्यास द्यावे. जनावरांना पुरेसा प्रथिनेयुक्त व हिरवा चारा आणि खनिजमिश्रण द्यावे.<br>➢ दुपारच्या वेळेस जनावरे चारावयास नेऊ नयेत. |
| पोल्ट्री पक्षी | वाढीची | पोल्ट्री पक्ष्यांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पुढील उपाय करावेत...<br>**निवारा व्यवस्थापन:**<br>➢ पोल्ट्रीमध्ये चांगली हवा खेळती ठेवावी<br>➢ पंखे / फॉगर / पाण्याची फवारणी वापरावी<br>➢ छतावर पांढरा रंग / गवताचे आच्छादन करावे<br>**पाणी व्यवस्थापन:**<br>➢ थंड व स्वच्छ पाणी सतत उपलब्ध ठेवावे<br>➢ पाण्यात इलेक्ट्रोलाइट्स व व्हिटॅमिन सी द्यावे<br>**खाद्य व्यवस्थापन:**<br>➢ सकाळी लवकर व संध्याकाळी खाद्य द्यावे<br>➢ दुपारच्या वेळेत खाद्य देणे टाळावे<br>**लिटर व्यवस्थापन:**<br>➢ लिटर कोरडी व स्वच्छ ठेवावी, ओलावा साचू देऊ नये<br>**उष्णता कमी करण्यासाठी:**<br>➢ पक्ष्यांची गर्दी कमी ठेवावी, कुक्कुटशाळेजवळ सावलीची व्यवस्था करावी |

| मेघदूत | दामिनी |
|---|---|
| ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर

दि. : १३.०४.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर